# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>
## <u>प्रेस नोट दि.१९/१०/२०१८</u>
## <u>दि.१८/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५२०/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५५,रा.गणेशनगर,धायरी,पुणे |
| **आरोपी** | दोन अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुलै २०१७ ते दि.२५/०५/२०१८ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकांनी फिर्यादी यांना वेळोवेळी फोन करुन,फिर्यादी यांना "कौन बनेगा महाकरोडपती लकी ड्रॉ मध्ये बक्षीस लागले आहे" असे सांगुन,बक्षिसाची रक्कम हवी असल्यास टॅक्सची रक्कम भरावी लागेल असे सांगुन,वेग-वेगळ्या बँक खात्यात एकुण ३,२८,२००/- रक्कम रुपये भरणा करावयास लावुन,फिर्यादी यांना लकी ड्रॉची रक्कम न देता त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पोलीस निरीक्षक,(गुन्हे) संगिता यादव ८१०८२५११०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५२१/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | विजय पारखी,वय-७५,रा.सिंहगड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०८/२०१८ रोजी १७/०० ते १७/३० वा.चे दरम्यान फोन व ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकांनी फिर्यादी यांना वेळोवेळी फोन करुन,त्यांचेशी संपर्क साधुन 'मी सरकारी बँकेतुन मधुन बोलत आहे' असे सांगुन,फिर्यादी यांचेकडुन बँकेतील खात्याची माहीती विचारुन,त्यांचे बँकेचे खात्यातुन ऑनलाईन पध्दतीने एकुण ४७,९००/- रुपये काढुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे) यादव ८१०८२५११०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११८२/१८,भादविक ३८६,४०६,४२०,३४१,५०४,५०६,५०९,३४,सह महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम ४४ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-४२ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार इसम, सर्वजण राहणार हडपसर पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसेंबर-२०१६ ते आजपावेतो हडपसर परिसरात तसेच फिर्यादीचे रहाते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना फोनवरुन वेळोवेळी फिर्यादी यांचेकडून अवास्तवदराने बेकायदेशीररित्या व्याजाची आकारणी करुन विश्वासघात करुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. तसेच फिर्यादी यांना बळजबरीने इतर कर्ज घेणा-या लोकांचे जामीनदार करुन त्याबदल्यात फिर्यादी यांना "तु आमचे पैसे वसुल करुन दे असे म्हणुन वारंवार खंडणीची मागणी केली,खंडणी नाही दिल्यास कुटुंबियाला जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांना वेळोवेळी रात्री-अपरात्री फोन करुन,फिर्यादी यांचे राहते घरी जावुन त्यांना व त्यांचे पत्नीला अश्लील भाषा वापरुन,फिर्यादी यांना विनाकारण अडवुन ठेवुन त्यांना शिवीगाळ केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.बी.डोके ८६५२१४७५७५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३१५/१८,भादविक ३७९ |

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | योगेश सहाणे,वय-३२,रा.मोशी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०१८ रोजी१०/०० वा.राजाबहादुर इन्टरनॅशनल लिमी.राजाबहादुर मोतीलाल रोड शेरेटॉन हॉटेलचे पाठीमागे पुणे येथे |
| **तपशिल** | नमुद वेळी व ठिकाणी राजाबहादुर इन्टरनॅशनल लिमी. राजाबहादुर मोतीलाल रोड शेरेटॉन हॉटेलचे पाठीमागील बाजुस पार्कींग मध्ये कंपनीच्या मालकीच्या एकुण नऊ गाडया पार्क केलेल्या असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने पार्कींग मधील कंपनीच्या मालकीच्या एकुण नऊ गाडयांच्या पुढील व पाठीमागील व दरवाजाचे सर्व काचा फोडुन त्याचे नुकसान करून गाडयांमधील चार लिनोव्हा कंपनीचे मॅक, गाणी ऐकण्याचा टेप व आग विझवण्याचा पंप असा एकुण ५२,७५०/- रू किचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.एन.ढोले ९८२२९०७१०० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३५६/१८,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | विनोद राठोड,वय-३८,रा.औंध रोड,पुणे |
| **आरोपी** | १.एक महिला,वय-२७,रा.सुभाषनगर,पिंपरी,पुणे मुळगांव-बैजीपुरा,औरंगाबाद २.एक महिला, वय-३०,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०१८ रोजी १९/०० वा. चे सुमारास राठोड ज्वेलर्स खडकी बाजार,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अनोळखी महीलांनी संगनमत करून,दसरा सणा निमित्ताने फिर्यादी यांचे राठोड ज्वेलर्स या दुकानात सोने खरेदी करण्याचे बहाण्याने येवुन,दुकानात असलेल्या गिह्राईकांच्या गर्दीचा फायदा घेवुन,हातचलाखीचे सोन्याची चेन १४ हजार रू किचे तसेच सोन्याची ब्रेसलेट २७ हजार रू किचे असे एकुण ४१ हजार रू किचे सोन्याचे दागिने चोरून नेवुन,त्याबदल्यात त्यांनी त्यांचे जवळ असलेले बेनटेक्सचे नकली दागिने ठेवुन चोरून घेवुन जात असताना,काही अंतरावर पोलीस जीप उभी असल्याचे फिर्यादी यांना दिसली. सदरचा प्रकार फिर्यादी यांनी त्यांना सांगितल्यानंतर त्यांनी लागलीच दोन्ही महिलांना सदर ऐवजासह ताब्यात घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निलेश महाडीक ९७६६६८८३२७ |
| **१** | **<u>दि.१९/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>** |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५२२/१८,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | संतोष टकले,पो.ना. सिंहगड रोड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.अज्ञात ट्रकवरील चालक २.ॲम्ब्युलन्सवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०१८ रोजी २१/४५ वा. संदेश हॉटेल समोर मुंबई-बेंगलोर हायवे रोडवर न-हे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात ट्रकवरील चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकल स्वार १.रघुनाथ गोरख भोंडवे,वय-३८,रा.सनं.१३३/३,फडतरे चाळ,भोपळे चौक, वारजे,पुणे २. आनंद प्रकाश व्यास,वय-३४,रा.सदर यांना पाठीमागुन जबर ठोस मारून, दोघांना जखमी केले. त्यानंतर दोघे जखमी इसम हे उठत असताना,त्यांना पाठीमागुन येणा-या ॲम्ब्युलन्स वरील अज्ञात चालकाने पुन्हा जोरात धडक देवुन,दोघांना गंभीर जखमी करून,त्यापैकी आनंद व्यास याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता ॲम्ब्युलन्स तेथेच सोडुन पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पाटील |

# पोलीस स्मृतिदिन २१ ऑक्टोबर २०१८

दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जातो. या दिवशी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावित असताना कामी आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस दलातर्फे मानवंदना देऊन श्रध्दांजली वाहण्यात येते. हा दिवस पोलीस दलाला अभिमानाचा, शौर्याला मानवंदना देण्याचा,त्याचबरोबर आपल्या जुन्या सहका-यांच्या स्मृतीने मन हेलावणाराही असतो.

२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जाण्यास १९५९ मध्ये लडाख भागातील सरहद्दीवर झालेली घटना कारणीभुत ठरली. भारत चीन सरहद्दीवर लडाख भागात १८ हजार फुट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज नावाचे ठिकाण आहे. २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉट स्पिंग्ज येथे गस्त चालु होती. गस्ती तुकडी नेहमी प्रमाणे गस्त घालण्यासाठी कुच करत हॉट स्पिंगच्या पुर्वेला ६ मैल दुर ती आली असताना पर्वताच्या डावे बाजुला तुकडीच्या नेत्याला काही काही संशयास्पद खुणा दिसल्या. तुकडी त्या खुणांच्या अनुरोधाने पुढे चालु लागली आणि
अचानक भयानक गोळीबार सुरू झाला. त्याठिकाणी पोलीस वीरांनी शौर्याने तोंड दिले. ही विशेष लढाई लढता लढता यापैकी १० गस्ती शिपायांना वीरमरण आले व ९ जण जखमी अवस्थेत शत्रुच्या हाती सापडले. हे १० अमर शिपाई होते पुरणसिंग, धरमसिंग, इंद्रजित सुबा, नोरबु लामा, शिवनाथ प्रसाद, त्शेरिंग नोरबु, इमामसिंग, सवन सिंग, बेगराज आणि माखनलाल असे होते. त्यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीवरही अचानक चिनी सैन्यांनी हल्ला केला होता. या लढाईत कामी आलेल्या या शुर पोलीस जवानांपैकी पश्चिम बंगालचे -३, हरियाणा – २, पंजाब-२, उत्तर प्रदेश-२, हिमाचल प्रदेश-१ असे होते. ही बातमी वा-यासारखी सा-या देशभर पसरली. १३ नोव्हेंबरला चिनी सैनिकांनी या हुतात्म्यांचे मृतदेह भारताच्या ताब्यात दिले. १४ नोव्हेंबरला सकाळी ०८/०० वा. हॉट
स्प्रिंग्ज येथे त्यांच्यावर सन्मानपुर्वक अंत्यविधी करण्यात आले. त्यावेळी प्रत्येक राज्यातील पोलीस दलांनी त्या त्या ठिकाणी या वीरांना श्रध्दांजली अर्पण केली.

त्यानंतर पाटणा येथे १९५९ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस स्पर्धांच्या वेळी सर्वांनी **‘आमच्या हया वीर हुतात्म्यांचे स्मरण आम्ही दरवर्षी २१ ऑक्टोबरला पोलीस हुतात्मा दिन पाळुन करू’** अशी शपथ घेतली,आणि तेव्हापासुन दरवर्षी हा दिन भारतवर्षात मोठया सन्मानाने **‘पोलीस हुतात्मा दिन’** म्हणुन पाळण्यात येतो. राज्या-राज्यातुन पोलीस दले या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी संचलन आयोजीत करून त्यांना मानवंदना देतात.

दि.१ सप्टेंबर २०१७ ते ३१ ऑगस्ट २०१८ या कालावधीत देशातील सर्व राज्यात पोलीस दलाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण **४१४** जणांनी आपले कर्तव्य बजावित असताना देह धारातीर्थ ठेवले. त्यामध्ये महाराष्ट्रातील **१.पो.हवा.२३०७२,सुनिल दत्तात्रय कदम २.पो.हवा.२७२,सुरेश दत्तात्रय गावडे ३.पो.कॉ. १५८९,सतिश श्रध्दाराव मडवी** अशा एकुण **०३** या पोलीस जवानांचा समावेश आहे.

दिनांक २१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०८/०० वा. पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे **मा.पद्मविभुषण डॉ.रघुनाथ अनंत माशेलकर (ज्येष्ठ शास्त्रज्ञ)** हे प्रमुख अतिथी म्हणुन वरील हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करणार आहेत.

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की,आपण पोलीस हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी **दि.२१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०७/५० वा.** उपस्थित राहावे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

## COMMEMORATION DAY PARADE

21St October, 2018

*To,*

*Smt./Shri.* सर्व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी.

*From :*

*The Commissioner of Police,*

*Pune City.*

# पोलीस स्मृतिदिन संचलन

## २१ ऑक्टोबर, २०१८

## Police Commemoration Day Parade

## 21st October, 2018

# पुणे शहर पोलीस आयुक्तालय

रविवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता
पोलीस संशोधन केंद्र, पाषाण, पुणे येथे

## पोलीस स्मृतिदिन संचलनास

आपणास उपस्थित राहण्याची विनंती करीत आहे.

## पद्मविभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर

(जेष्ठ शास्त्रज्ञ)

हे पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करणार आहेत.

पोषाख : राष्ट्रीय / समारंभीय — पोलीस अधिकारी : रिव्ह्यू ऑर्डर टाईप बी

कृपया ही निमंत्रण पत्रिका सोबत आणावी आणि सकाळी ७.५० वाजणेपूर्वी आसनस्थ व्हावे.

---

# Pune City Police Commissionerate

Solicit your presence
at

## Police Commemoration Day Parade

On Sunday, the 21st October 2018 at 8.00 a. m.
at the Centre for Police Research,
Pashan, Pune.

## Padma Vibhushan Dr. Raghunath Anant Mashelkar

(Eminent Scientist)

**has kindly consented to lay the wreath.**

**Dress : National/Formal** — **Police Officers : Review Order Type B**

Requested to kindly Carry this card and be seated before 7.50 a. m.